● रविवार, दि. २९ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १५१ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## लहानग्यांना कराव्या लागताहेत जीवघेण्या कसरती!



**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी** - शासनाचा आधार नाही, जन्माचे गाव नाही, घराचा पत्ता नाहीत शिक्षणाचा गंध नसलेल्या डोंबारी समाजाची व्यथाच निराळी आहे. 'उद्याच्या पोटाची काळजी कशाला, आभाळ पांघरू दगड उशाला, गाळुणी घाम आता मागू या भाकरी। नाचतो डोंबारी गं नाचतो डोंबारी' या ओळी डोंबारी समाजाची स्थिती सांगणाऱ्या आहेत.

शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करत असताना वास्तव वेगळेच आहे. दुसऱ्या राज्यातून येऊन भटकंती करत असतात डोंबारी लहान जिवांना जीवघेण्या कसरती करायला लाऊन त्यातून मिळणाऱ्या पैशांवर उदरनिर्वाह करतानाचे चित्र शुक्रवारी (दि.२७ ) टेंभुर्णी रोडवर बँक बडोदा बँकेसमोर दिसून आले. डोंबारी समाज विविध कसरती करून पोटाच्या खळगीसाठी जीव टांगतीला टाकल्याचे भयानक वास्तव पाहण्यास मिळाले.

डोंबाऱ्यांचा खेळ म्हणजे देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानंतरही जगण्यासाठी सुरु असलेली गरीबाची धडपड आहे. देश एकीकडे हजारो मैल दूर चंद्रावर, मंगळावर जात असतांना डोंबाऱ्यांच्या मुलांना मात्र, हातात काठी घेऊन उंचीवर असलेल्या दोरीवर एका टोकावरुन दुसऱ्या टोकावर तोल सांभाळत कवायतीचा खेळ दाखवून जीवन जगावे लागत आहे.

डोंबारी समाजातील लहान मुलांना चालता बोलता यायला लागले की, वेगवेगळी कवायती कराव्या लागतात. त्यातून मिळणाऱ्या पैशातून कुटुंबियांचा उदरनिर्वाह होत असतो. त्यामुळे या समाजातील कुटुंबियांच्या व्यथा अनेकांच्या डोळ्या पाणी आणणाऱ्या आहेत. या समाजाची अद्यापही हवी तशी प्रगती झालेली **पान २ वर**

## सामनगाव येथील घनकचरा प्रकल्प कार्यान्वित

### मनपामार्फत नागरिकांना कचरा घंटागाडीत टाकण्याचे आवाहन



**जालना । प्रतिनिधी** - शहराजवळील सामनगाव येथील घनकचरा प्रकल्प कार्यान्वित झाला असून येथे कचऱ्यावर प्रक्रिया करण्यास सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती जालना शहर महानगर पालिका प्रशासनाच्यावतीने देण्यात आली आहे. तसेच नागरिकांनी कचरा हा विलगीकृत करुन घंटागाडीत टाकण्याचे आवाहनही मनपा प्रशासनाकडुन करण्यात आले आहे.

शहर मनपाच्यावतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, घनकचरा प्रक्रिया केंद्र सामनगांव याठिकाणी शहरातील दैनंदिन निम र्‍ण होणारा एकुण ११५ टन कचरा टाकण्यात येतो. यामध्ये ओला कचरा, **पान २ वर**

## मयतांच्या कुटुंबियांना राहुल लोणीकरांच्या पुढाकाराने बागेश्वरी कडून आर्थिक मदत

**परतूर । प्रतिनिधी** - परतूर तालुक्यातील वरफळ येथील श्रद्धा एनर्जी अँड इन्फ्राप्रोजेक्टच्या माँ. बागेश्वरी साखर कारखान्यात भीषण स्फोट झाल्याची घटना घडली या घटनेत दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, दोन जण गंभीर जखमी झाले असून सदरील घटना दिनांक २६ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास घडली आहे.

गुरूवारी साखर कारखान्यातील सर्वच विभागातील अधिकारी कर्मचारी नेहमी प्रमाणे काम करत असताना सहा वाआजेच्या सुमारास अचानक मोठ्ठा आवाज झाला आणि अधिकारी, कर्मचारी, कामगार, सुरक्षारक्षक, कामगारांमध्ये एकच धांदल उडाली आणि सगळेजण सैराभैरा पडू लागले पाहिले तर काय चुना भट्टी विभागातील एका टाकीमध्ये स्फोट होऊन दोन जण गंभीर अवस्थेत तर अन्य दोन जण जख्मी आढळून आले या चारही कामगारांना कारखाना प्रशासन व स्थानिक कामगारांनी तत्काळ ग्रामीण रुग्णालयात हलविले मात्र यातील दोन जणांना वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून मृत घोषित केले आणि उर्वरित दोन जणांवर उपचार करण्यात आले या घटनेने परिसरात



एकच खळबळ माजली आहे.

या घटनेत आप्पासाहेब शंकर पारखे वय ४४ रा. सिरजगाव आणि अशोक तेजराव देशमुख रा. राहुरी ता. सिंदखेडराजा यांचा या स्फोटात जागीच मृत्यू झाला. तर, नवनाथ पंढरपोटे आणि कदिर युनूस पटेल हे दोघे किरकोळ जखमी झाले आहेत. जखमींवर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी जालना येथे हलविण्यात आल्याची माहिती वैद्यकिय अधिकारी यांनी दिली.

हा स्फोट कशामुळे झाला? याबाबत अद्यात कोणतीही अधिकृत माहिती समोर आली नाही. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव **पान २ वर**

युवा आदर्श


### निखारे ...

नांदी देई वादळाची
अडवू नकात हे वारे
झटकली जाई राख
शिलगावती निखारे
उर्जा देती आंदोलना
धग धग पेटते अंगारे
पकडणारं कोणकसे
तेल लावल्या अंगा रे
मल्ल तयारलढायला
घेऊ नकांत रे पंगा रे
शिकविते परिस्थिती
तोंड दे कटू प्रसंगा रे
समाज अगदी निर्दयी
हसते आपले व्यंगा रे
भिन्न वळण संघर्षाला
करायचा फक्त दंगा रे
आठवा जरा गांधींनां
जप विचार व्यासंगा रे
आडवे येती अडथळे
पुरणारं ना पासंगा रे
शांती पूर्ण आंदोलने
कशाला धाडधिंगा रे
प्रश्न सुटतात चर्चेतून
कंटाळे लोक ढोंगा रे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## थर्टी फर्स्ट; ड्रिंक अँड ड्राइव्हच्या अनुषंगाने पोलिसांच्यावतीने नाकाबंदी

### गैरकृत्य करणाऱ्यांविरुध्द कारवाईचा ईशारा



**जालना । प्रतिनिधी** - जालना अवघ्या तीन दिवसावर येऊन ठेपलेल्या थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर जालना पोलीस प्रशासन सज्ज झाले असून ड्रंक अँड ड्राईव्ह च्या अनुषंगाने जालना पोलीसांच्या वतीने जिल्ह्याभरात ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात येणार असल्याची माहीती जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी दिली आहे.

पोलीस अधीक्षक बंसल यांनी शनिवार (दि. २८) रोजी दुपारी दोन वा. च्या सुमारास माध्यमांशी संवाद साधत होते. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की,थर्टी फस्ट आणि नविन वर्षाचे स्वागत करत आसताना आनंदाने सण साजरे करावे परंतू जबाबदार नागरीक म्हणून कुठेही अनुचित प्रकार घडेल असे कृत्य करू नये असे आवाहनही **पान २ वर**

## चोरीच्या आठ मोटार सायकल जप्त

### परतूर पोलिसांची कारवाई

परतूर । प्रतिनिधी - चोरीस गेलेल्या आठ मोटार सायकल परतूर पोलिसांनी जप्त केल्या आहेत. परतुर पोलीस हे नाकाबंदी करत असतांना मनोज सुभाष मुंडलीक हा इसम एक काळ्या रंगाची विना क्रम ांकाची बुलेट गाडी चालवत मिळुन आला. पोलिसांनी त्यास विचारपुस करन सदरची मोटार सायकल तपासली असता ती पुणे येथुन चोरुन आणल्याचे समोर आले.

२७/१२/२०२४ रोजी परतुर पोलीस हे नाकाबंदी करत आसतांना ईसम नामे मनोज सुभाष मुंडलीक याच्या ताब्यात एक काळया रंगाची बुलेट विना क्रमांकाची चालवत असतांना मिळुन आली त्यास विचारपुस करत सदरची मो. सा चेक केली असता पुणे येथुन चोरुन आनल्याचे कळाल्याने त्यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांच्या घरी मापेगाव येथुन ०३ मो.सा व ईतर लोकाना विक्री केलेल्या एकुण ०८ मोटार सायकली जाप करण्यात



आल्या व आरोपीच्या मुसक्या आवळल्या सदर आरोपीने मो.सा हया पुणे शहरातून विविध ठिकाणावरुन चोरुन आनल्याचे सांगीतले आहे. त्यामध्ये शिवाजीनगर संचेती हॉस्पीटल पुणे येथुन बुलंद, बानर रोड शिवाजी नगर येथून शाईन, स्वारगेट पुणे येथून पॅशॉन प्रो सुगर हॉस्पीटल शिडी येथुन बजाज डिस्कव्हर, दगडुशेट गणपती मंडी जवळून शाईन मो.सा, सिक्रापुर रोड पुणे चाकन येथुन ड्रीमयुगा, स्वारगेट बस स्थानक यथुन सुपर सलेंडर अशा तसेच परतूर यंथुन एक मो. सा चोरल्याची कबुली दिली. ८ मोटार सायकल त्याच्याकडुन जापत करण्यात आलेल्या आहेत. सदर गुन्हयात जप्त केलल्या मो.सा वी इंजीन नंबर व चेसिस नंबर देण्यात आलेल्या आहेत ज्या कोणाची मोटार सायकल असेल त्यांनी पां. स्ट परतुर येथ संपर्क साधावा असे एम.टी सुरवसे पोलीस निरीक्षक परतुर **पान २ वर**

## जिप व पंचायत समिती भाजपच्या ताब्यात घेण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी सज्ज रहा - भास्कर दानवे




**जालना । प्रतिनिधी** - भारतीय जनता पार्टी जालना ग्रामीण मंडळाची सदस्यता नोंदणी अभियान कार्यशाळा भाजपा जिल्हा जालना कार्यालयात आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे तर भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, प्रदेश निमंत्रीत सदस्य रामेश्वर भांदरगे, भाजपा जिल्हा सरचिटणीस सिध्दीविनायक मुळे, भाजपा जिल्हा चिटणीस बाबुराव खरात, युवा मोर्चा जिल्हध्यक्ष भागवत बावणे, भाजपा तालुकाध्यक्ष वसंतराव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्ह्यातील भाजपा पदाधिकाऱ्यांशी पुढे बोलताना भास्कर दानवे म्हणाले की, आपल्या पक्षाची ताकद काय आहे हे दाखवून देण्यासाठी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकविण्यासाठी पदाधिकारी व कार्यर्त्यानी मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी करणे गरजेचे **पान २ वर**

## विस्तार न करता नांदेडहून स्वतंत्र वंदे भारत रेल्वे सुरु करा

### व्यापारी महासंघाची विभागीय रेल्वे व्यवस्थापकांकडे मागणी



**जालना । प्रतिनिधी** - वंदे भारत रेल्वेचा विस्तार नांदेडपर्यंत करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. हा जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नागरिकांवर अन्याय करणारा आहे. त्यामुळे स्वतंत्र वंदे भारत रेल्वे सुरु करण्याची मागणी जालना जिल्हा व्यापारी म हासंघाने दक्षिण मध्य रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती संभाजीनगर आणि जालना या प्रमुख औद्योगिक शहरांकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. **पान २ वर**

संपादकीय पान

## बॉलिवूडचे पाहिले सुपरस्टार

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांचा आज जन्म दिन. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट साबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला. बाबूमोशाय... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा...जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है... कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता... आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है... मीस यु....राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना श्रध्दांजली

**जालना । प्रतिनिधी** - जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात देशाचे माजी पंतप्रधान जागतिक किर्तिचे अर्थतज्ञ, रिझर्व बँकेचे माजी गर्व्हनर डॉ. मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रध्दाजली अर्पण करण्यात आली. श्रध्दाजली सभेचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी डॉ. मनमोहन सिंग यांच्य जीवनावर प्रकाश टाकला. यावेळी बोलत असतांना त्या अशा म्हणाल्या की, डॉ. मनमोहन सिंग हे देशाचे पंतप्रधान असतांना त्यांनी देश अर्थिक दृष्टया संपन्न करण्यासाठी महत्वाचे निर्णय घेतले. जागतिक मंदीच्या काळात त्यांनी देशाची आर्थिक बाजू भक्कमपणे सांभाळली. कमी बोलणे आणि खंबीर निर्णय घेणे ही त्यांची कार्यपध्दती होती. असे मत व्यक्त करुन माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून श्रध्दांजली अर्पण केली. यावेळी महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिक्षक अर्जुन भाबड यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी,प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. लहुराव दरगुडे यांनी केले.

# शिर्डी येथील ‘महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे’त ठरल्याप्रमाणे सोलापूर येथून ‘मंदिर तेथे सामूहिक आरती’ला प्रारंभ!

**शिर्डी** - मंदिरांवरील, तसेच मंदिराच्या भूमीवरील अतिक्रमणे तात्काळ हटवण्यात यावी या मागणीसाठी दर आठवड्याला ‘मंदिर तेथे सामूहिक आरती’ करण्याचा निर्णय नुकताच शिर्डी येथे ‘महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे’त एक हजारांहून अधिक मंदिरांच्या विश्वस्तांनी घेतला होता. त्याप्रमाणे या अनुषंगाने सोलापूर येथील श्रीवैष्णव मारुती देवस्थानात राज्यातील पहिली ‘सामूहिक आरती’ मोठ्या उत्साहाने आणि भावपूर्ण वातावरणात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली, अशी माहिती ‘मंदिर महासंघा’चे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी दिली आहे.

सोलापूर येथील श्री वैष्णव मारुती देवस्थान, जुने घरकुल या ठिकाणी महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि श्री वैष्णव मारुती देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने ‘सामूहिक आरती’ करण्यात आली. या वेळी मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट, श्री वैष्णव मारुती देवस्थानचे अध्यक्ष श्री. भास्कर राऊळ, विश्वस्त श्री. दीपक परदेशी, श्री. नारायण दुभाषी, श्री. रामकृष्ण सुंचू, श्रीनिवास कोत्तायम, श्रीगणेश मंदिराचे अध्यक्ष श्री. वेणूगोपाल म्याना, श्री चौडेश्वरी मंदिराचे पुजारी श्री. गोवर्धन म्याकल, पद्माशाली पुरोहित संघटनेचे सदस्य श्री. व्यंकटेश जिल्ला, श्री परमेश्वरी देवस्थानचे पुजारी श्री. विठ्ठल पांढरे, हिंदुत्वनिष्ठ श्री. विजय इप्पाकायल, श्री. धन्यकुमार चिंदे, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे श्री. विनोद रसाळ, हिंदु जनजागृती समितीचे श्री. संकेत पिसाळ, श्री. गौरीशंकर कलशेट्टी, श्री. धनंजय बोकडे आणि श्री. बालराज दोंतुल यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.



२४ आणि २५ डिसेंबरला श्री साई पालखी निवारा, निमगांव, शिर्डी येथे झालेल्या तृतीय ‘महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे’त महाराष्ट्रभरातून ८७५ हून अधिक निमंत्रित मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित, मंदिरांच्या रक्षणासाठी लढा देणारे अधिवक्ते तथा मंदिर अभ्यासक सहभागी झाले होते. यात प्रामुख्याने मंदिरे, तसेच मंदिरांच्या भूमीवर झालेल्या अतिक्रमणाच्या विरोधात दर आठवड्यातून एकदा ‘मंदिर तेथे सामूहिक आरती’ करणे, काशी आणि मथुरा तीर्थत्रक्षेत्रांचा खटला जदलगती न्यायालयात चालवावा; सरकारने राज्यातील सर्व मंदिरे सरकारमुक्त करून ती भक्तांच्या स्वाधीन करावीत; मंदिरात भक्तांनी अर्पण केलेला निधी महाराष्ट्र सरकारने विकासकामांसाठी न वापरण्याची घोषणा करावी; मंदिर परिसर ‘मद्य-मांस मुक्त’ होण्यासाठी सरकारने अधिसूचना काढावी; राज्यातील मंदिरांच्या पुजार्यांना प्रतिमाह मानधन देण्याचा निर्णय घ्यावा आदी प्रमुख मागण्या ठरावांद्वारे सरकारकडे करण्यात आल्या होत्या. या मागण्या सरकारने तात्काळ पूर्ण करण्यात याव्यात, अशी मागणी मंदिर महासंघाचे श्री. घनवट यांनी केली आहे.

# नोव्हेक्स म्युझिक परवाना न घेता हिंदी बॉलीवूड गाणी वाजविल्याने लोणावळा पोलिसांनी ३ रिसॉर्ट्सवर धडक कारवाई करून कॉपीराईट कायद्यानुसार गुन्हा दाखल

नोव्हेक्स कम्युनिकेशन प्रा. लि. या म्युझिक कंपनीने फिल्म इंडस्ट्रीतील टिप्स कंपनी, झी म्युझिक (झी टीव्ही), यशराज फिल्म्स, दिलेर मेहंदी रेकॉर्ड्स, थिंक म्युझिक व इतर म्युझिक कंपन्यांकडून त्यांच्याच गाण्यांचे स्वामित्व हक्क (अधिकार) घेतलेले असून,



हॉटेल्स, बार, रिसॉर्ट्स व सर्व सार्वजनिक ठिकाणी वाजवल्या जाणाऱ्या हिंदी बॉलीवूड गाण्यांसाठी पब्लिक परफॉर्मन्स लायसन्स कंपनीकडून घेणे आवश्यक आहे.

पुण्यातील लोणावळ्यात १) लगुना रिसॉर्ट, २) अपर डेक, ३) अरोन रिसॉर्ट या तीन रिसॉर्ट्सनी परवाना न घेता बॉलीवूड हिंदी गाणी वाजवली, म्हणून लोणावळा पोलिसांनी दिनांक २०-१२-२०२४ रोजी गु. र. क्र. ५१९/२४ कलम ५१, ६३ कॉपीराईट कायद्यान्वये तीनही रिसॉर्ट्सच्या मालक/संचालकांवर गुन्हा दाखल केलेला आहे.

आगामी येणाऱ्या नववर्षाच्या पूर्वसंध्येला खबरदारी म्हणून नोव्हेक्स कंपनीचे छाननी अधिकारी हॉटेल्स, पब्स व सार्वजनिक कार्यक्रमांच्या ठिकाणी फिरून, विनापरवाना हिंदी गाणी वाजवली जात आहेत की नाही याची बारकाईने तपासणी करणार आहेत. तसेच महाराष्ट्र पोलीस दल हे देखील कॉपीराईट कायद्याचे उल्लंघन होणार नाही यासाठी त्यांच्या हद्दीतील आस्थापनांवर लक्ष केंद्रित करून कार्यरत आहेत.

लोणावळ्यातील ३ रिसॉर्ट्सवर कायदेशीर कार्यवाहीसाठी श्री सुनील फुलारी, मा. विशेष पोलिस महानिरीक्षक, कोल्हापूर परिषेत्र, पंकज देशमुख - पोलिस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे मार्गदर्शन व देखरेख खाली लोणावला पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक व त्यांच्या स्टाफ यांही कॉपीराइट कायद्यांवये होणाऱ्या उल्लंघनाची गंभीरतेने दाखल घेऊन तत्परतेने पुढाकार घेतल्यामुळे गुन्हा दाखल होण्यास खूप मदत झाली आहे.

दाखल गुन्ह्याचा बारकाईने तपास करून रिसॉर्ट्स मालक / संचालकाविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची कंपनीला खात्री आहे.

तरी हॉटेल्स/पब्स व सर्व सार्वजनिक ठिकाणी भविष्यात / नववर्षाच्या पूर्वसंध्येला होणाऱ्या कार्यक्रमासाठी नोवेक्स म्युझिक कंपनीकडून लायसन्स न घेता, बॉलिवूड हिंदी गाणी वाजवतील त्यांच्यावर कडक कार्यवाही होणार आहे हे सर्वांनी लक्षात ठेवावे.

## पान १ वरुन

### लहानग्यांना कराव्या ...

दिसून येत नाही. शासनाचेही दुर्लक्ष होत आहे.

शिक्षण, विकास आणि आधुनिकतेचा स्पर्श नसलेल्या डोंबारी समाज रस्त्याच्या कडेला बाजारपेठेत पारंपारिक डोंबारी कला सादर करत जिवन जगत असतो. आजच्या आधुनिक आणि गतीमान जगात दुर्मिळ झालेला डोंबारीचा खेळ पाहण्याकडे सध्या कुणाकडे वेळ नसल्याने या समाजाचा मुळ उपजीवीकेचा व्यवसाय अडचणीत आला आहे. पुर्वी गावोगाव-गल्लोगल्ली डोंबारी समाज आपल्या कसरतीचे खेळ करीत असत. या खेळातून त्यांना चांगले पैसे मिळत असत. परंतु काळाच्या ओघात हा खेळ पाहण्यासाठी पुर्वीप्रमाणे लोकं जमत नसल्यामुळे या समाजाच्या कुटुंबाची उपजीविकेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

### सामनगाव येथील ...

दिसून येत नाही. शासनाचेही दुर्लक्ष होत आहे.

शिक्षण, विकास आणि आधुनिकतेचा स्पर्श नसलेल्या डोंबारी समाज रस्त्याच्या कडेला बाजारपेठेत पारंपारिक डोंबारी कला सादर करत जिवन जगत असतो. आजच्या आधुनिक आणि गतीमान जगात दुर्मिळ झालेला डोंबारीचा खेळ पाहण्याकडे सध्या कुणाकडे वेळ नसल्याने या समाजाचा मुळ उपजीवीकेचा व्यवसाय अडचणीत आला आहे. पुर्वी गावोगाव-गल्लोगल्ली डोंबारी समाज आपल्या कसरतीचे खेळ करीत असत. या खेळातून त्यांना चांगले पैसे मिळत असत. परंतु काळाच्या ओघात हा खेळ पाहण्यासाठी पुर्वीप्रमाणे लोकं जमत नसल्यामुळे या समाजाच्या कुटुंबाची उपजीविकेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

### मयतांच्या कुटुंबियांना ...

घेऊन पंचनामा केला. घटनेची माहीत मिळताच स्थानिक आमदार बबनराव लोणीकर यांनी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा पोलीस अधिक्षक व वैद्यकिय अधिकारी यांच्याशी बोलून योग्य त्या सूचना केल्या आहेत. घटनेची माहिती मिळताच भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी ग्रामीण रुग्णालयात धाव घेऊन पोलीस प्रशासन, वैद्यकीय अधिकारी, कारखाना प्रशासन यांच्याशी चर्चा केली व घटने बाबत दुःख व्यक्त करत मयत कुटुंबाची नियोजित कार्यक्रमांना फाटा देत राहुल लोणीकर पीडितांच्या न्यायासाठी रस्त्यावर दिनांक २५ डिसेंबर रोजी भाजपचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांचा वाढदिवस होता वाढदिवसाच्या निमित्ताने परतूर मंठा विधानसभा मतदारसंघात दिनांक २६ व २७ डिसेंबर रोजी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते ते सर्व कार्यक्रमाला फाटा देत माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल लोणीकर यांनी बागेश्वरी साखर कारखान्यात घडलेल्या घटनेतील पीडित कुटुंबांच्या न्याय व मदतीसाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले आणि दुसऱ्या दिवशी सुद्धा सकाळी शवविच्छेदन व इतर सर्व प्रक्रिया पूर्ण होउस्तर पीडित कुटुंबासोबत होते. भेट घेऊन सांत्वन केले तर जखमी रुग्णांची विचारपूस केले.

यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना राहुल लोणीकर यांनी सांगितले की घडलेली घटना ही अत्यंत दुर्दैवी असून आमदार बबनराव लोणीकर यांनी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ जिल्हा पोलीस अधीक्षक यांना घटनेच्या अनुषंगाने सूचना केल्या आहेत यासोबत घटना कशी घडली या बाबत चौकशी करण्याच्या बाबतीत पोलीस प्रशासनाला सूचना केली आहे.

घटनेची खबर वाऱ्यासारखी पसरली असतांना तहसीलदार प्रतिभा गोरे, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री दादाराव चौरे, पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे यांच्यासह सामाजिक राजकीय नेत्यांनी घटनास्थळी व ग्रामीण रुग्णालयात धाव घेऊन पाहणी केली.

दोन्ही मृत कामगारांवर अंत्यसंस्कार...? तालुक्यासह जिल्ह्याला हादरून टाकणाऱ्या घटनेतील मृत कामगारांचे आज दिनांक २७ डिसेंबर रोजी सकाळी ग्रामीण रुग्णालयामध्ये शवविच्छेदन करण्यात आले अप्पासाहेब पारखे यांच्या पार्थिवावर तालुक्यातील सिरजगाव येथे तर अशोक देशमुख यांच्यावर त्यांच्या मूळ गावी शोकमय वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. राहुल लोणीकर यांच्या पुढाकाराने मयत कुटुंबांना बागेश्वरीची आर्थिक मदत गुरुवारी घटना घडल्या घडल्या माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ जिल्हा पोलीस अधिक्षक अजय कुमार बंसल व बागेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव जाधव यांच्या संपर्कात राहून घटने संदर्भात आवश्यक सूचना केल्या तसेच दोन्ही मयत कुटुंबाच्या नातेवाईकांच्या आग्रहास्तव मयत कुटुंबांच्या मुलांच्या शिक्षणासह अन्य गरजा पूर्ण करण्यासाठी आर्थिक मदत सुद्धा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला.

यावेळी राहुल लोणीकर यांना बागेश्वरीचे चेअरमन शिवाजीराव जाधव यांनी मयत कुटुंबांना प्रत्येकी १० लक्ष रुपये आर्थिक मदत देणार असल्याचे भ्रमणध्वनीवर राहुल लोणीकर यांना सांगितले.

### थर्टी फर्स्ट ...

त्यांनी केले. थर्टी फर्स्टच्या निमित्ताने जिल्ह्याभरात ३० पेक्षा जास्त मशिन द्वारे ठिकठिकाणी ड्रंक-ड्राईव्ह साठी आल आऊट आपरेशन राबविण्यात येणार असून कुणीही दारू पिऊन गैरकृत्य करताना आढळून आले तर कायदेशिर कडक कारवाई करण्यात येईल. असा ईशारा पोलीस अधीक्षकांनी दिला आहे.

### चोरीच्या आठ ...

यांनी कळवीले आहे. सदरची कार्यवाही मा.अजय कुमार बन्सल साहय, पोलीस अधिक्षक जालना, मा आयुष नापानी साहय, अपर पोलीस अधिक्षक जालना मा. दादाहरी चौर साहेब उर्गावभागीय पोलीस अधिकारी उपविभाग परतुर यांच मार्गदर्शनाखाली एम.टी. सुरयम साहब, पालीस निरीक्षक परतूर, विठ्ठल कद्र पोउपनि, पोहेको ए.एल. गाढव, पांकी जी.यो. पवार, पाको ग्ही. जी. जाधव, पाको एस, जाभय, पोको डी.ए. आहे, पोको अच्युत चला, पोर्को एस. गायकवाड यांनी कली.

### जिप व ...

आहे. दर तीन वर्षांनी भाजपाचे सदस्य नोंदणी अभियान राबविले जाते.

देशातील नव्हेच तर जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष भारतीय जनता पार्टी ठरलेला आहे. पुन्हा एकदा त्याच शिखरावर आपल्या पक्षाला न्यायचे आहे. भारतरत्न श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी नेहमी सांगायचे सतत चालत रहा थांबायचे नाही थांबलो तर संपला त्याप्रमाणे आपण अधिक जोशाने सदस्य नोंदणी करा, यासाठी अत्यंत सोपी पद्धत आहे. सदस्य होण्यासाठी केवळ ८८ 0000 २०२४ या क्रमांकावर मिस्ड कॉल करा व सदस्य व्हा तसेच आपली वैयक्तीक माहिती द्यायची असल्यास मिस्ड कॉल केल्यानंतर आपल्याला एसएमएस मेसेज येईल त्यामध्ये आलेल्या लिंक वर जाऊन आपण माहिती भरू शकता. तसेच आपला सदस्य नोंदणी क्रमांकासहित आपला फोटोसह सदस्य भाजपा नोंदणी चे कार्ड डाऊनलोड करू शकता. भाजपा सदस्य नोंदणी अभियान २०२४ हे १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ पर्यंत विशेषता राबविण्यात येत आहे. त्यामुळे जास्तीजास्त सदस्य नोंदणी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी भाजपा जिल्हा पदाधिकारी,मंडळ पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, शक्तीकेंद्र प्रमुख, बुथप्रमुख व कार्यकर्त्यांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.

### विस्तार न करता ...

या भागात व्यापारी आणि उद्योजकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मुंबईला जाण्यासाठी वंदे भारत रेल्वेचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. ही रेल्वे नेहमीच प्रवाशांनी भरलेली असते. नांदेडपर्यंत वंदे भारत रेल्वेच्या विस्तारीकरणामुळे छत्रपती संभाजीनगर आणि जालन्यातील प्रवाशांचा कोटा कमी होणार असल्याने व्यापारी व उद्योजकांवर अन्याय होणार आहे. त्याचा विस्तार नांदेडपर्यंत झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. तसेच आठवडयातून ३ दिवस गुजरात राज्यासाठी विशेष रेल्वे सुरू करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जालना रेल्वे स्थानकातील सुविधांमध्ये सुधारणा कराव्यात, रेल्वे स्थानकाच्या नवीन इमारतीचे बांधकाम तत्काळ पूर्ण करावे. स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा पुरवाव्यात, वंदे भारत ट्रेनचा नागपूरपर्यंत विस्तार करणे हा छत्रपती संभाजीनगर आणि उद्योजकांवर अन्याय होईल. हा निर्णय रद्द न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा व्यापारी महासंघाने निवेदनात दिला आहे. यावेळी व्यापारी महासंघाचे पदाधिकारी विनीत साहनी, संजय दाड, शामसुंदर लोया, दिलीपभाई शाह, विनोद पवार, विनोद कुमावत, साईनाथ चिन्नादोरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्राचा ५८व्या निरंकारी संत समागमाच्या स्वेच्छा सेवांचा शुभारंभ

# पुण्याच्या धरतीवर होणार संत समागम

**पुणे । प्रतिनिधी -** महाराष्ट्राच्या ५८व्या वार्षिक निरंकारी संत समागमाचे भव्य आयोजन सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन छत्रछायेमध्ये दिनांक २४, २५ व २६ जानेवारी, २०२५ रोजी मिलीटरी डेअरी फार्म ग्राउंड, पिंपरी पॉवर हाउस जवळ, शास्त्री नगर, पुणे ४११०१७ (महाराष्ट्र) येथील विशाल मैदानांवर आयोजित केला जात आहे. परमात्म्याची ओळख करुन मानवी जीवन दिव्य गुणांनी युक्त करत अनंताकडे विस्तारित करुन विश्वामध्ये सौहार्द व शांतीसुखाचे वातावरण निर्माण करणे हा या संत समागमाचा मुख्य उद्देश आहे.




या भव्यदिव्य आध्यात्मिक आयोजनाची पूर्वतयारी करण्यासाठी स्वेच्छा सेवांचा विधिवत शुभारंभ संत निरंकारी मंडळाच्या प्रचार-प्रसार विभागाचे मेंबर इंचार्ज आदरणीय श्री.मोहन छाब्राजी यांच्या शुभहस्ते बुधवार, दि. २५ डिसेंबर, २०२४ रोजी करण्यात आला. या प्रसंगी संत निरंकारी मंडळाच्या वित्त व लेखा विभागाचे मेंबर इंचार्ज श्री.जोगिंदर मनचंदा, प्रचार प्रसार कॉर्डिनेटर (महाराष्ट्र) डॉ.दर्शन सिंह, समागम समितीचे चेअरमन श्री.शम्भुनाथ तिवारी, समन्वयक श्री.ताराचंद करमचंदानी आणि समागम समितिच्या अन्य सदस्यांसहित समस्त महाराष्ट्रातील सेवादल क्षेत्रीय संचालक उपस्थित होते. हजारो सेवादल स्वयंसेवकांसह महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून मोठ्या संख्येने आलेल्या भाविक भक्तगणांनी या समारोहामध्ये भाग घेतला.

स्वेच्छा सेवांच्या उद्घाटन प्रसंगी आपले भाव व्यक्त करताना आदरणीय श्री.मोहन छाब्राजी म्हणाले, की सतगुरुंच्या असीम कृपेने आयोजित होत असलेल्या या संत समागमामध्ये तोच सत्याचा संदेश दिला जाईल जो युगानुयुगे संत-महापुरुषांनी समस्त मानवतेला दिला.

ते पुढे म्हणाले, की संत निरंकारी मिशन मानवता व विश्वबंधुत्वाचे मिशन आहे. परमात्म्याचे ज्ञान प्राप्त केल्याने मानवा-मानवातील अंतर संपून जाते आणि एकमेकांशी प्रेमाचे नाते जोडले जाते. ज्यायोगे वैर, द्वेष, ईर्षा यांसारख्या दुर्भावना दूर होतात. ब्रह्मानुभूतिने आत्मानुभूति प्राप्त करुन मानवी गुणांनी युक्त होऊन धरतीसाठी वरदान बनेल असे जीवन जगणे हे मनुष्य जीवनाचे मुख्य लक्ष्य आहे.

उल्लेखनीय आहे, की महाराष्ट्रात वार्षिक निरंकारी संत समागमांची परंपरा फार जुनी आहे. १९६८ मध्ये महाराष्ट्राचा पहिला संत समागम मुंबईतील प्रसिद्ध शिवाजी पार्क मैदानावर आयोजित करण्यात आला व त्यानंतर सतत ५२ संत समागम मुंबई महानगरातच होत आले. सन २०20 मध्ये ५३वा संत समागम नाशिक मध्ये झाला, ५६वा संत समागम छत्रपती संभाजी नगर येथे तर ५७वा संत समागम नागपुर नगरी येथे आयोजित करण्यात आला. यावर्षी हा ५८वा संत समागम आयोजित करण्याचे सौभाग्य विद्येचे माहेरघर पुणे नगरीला प्राप्त झाले आहे, ज्याचे साक्षी अवघे विश्व होईल.

समालखा येथे आयोजित ७७व्या वार्षिक निरंकारी संत समागमानंतर प्रतिवर्षाप्रमाणे प्रत्येक भक्त महाराष्ट्राच्या ५८व्या वार्षिक निरंकारी संत समागमाची मोठ्या आतुरतेने वाट पाहत आहेत.

हा दिव्य संत समागम सर्वार्थाने यशस्वी व्हावा यासाठी निरंकारी सेवादलाचे स्वयंसेवक आणि मोठ्या संख्येने अन्य निरंकारी भक्तगण मोठ्या तन्मयतेने समागम स्थळावर पूर्वतयारीसाठी आपल्या निष्काम सेवा अर्पण करत आहेत.

## कदिम जालना पोलीस स्टेशन जुन्या जागेत स्थलांतर करण्याची मागणी

पोलीस चौक्यांवर कायमस्वरुपी पोलीस कर्मचारी उपलब्ध ठेवा

**जालना । प्रतिनिधी -** देहेडकरवाडी येथे दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता पुणे येथील एक इंडिका कार आली असता त्या कारला दोन तीन महिला व पुरुषांनी अडवले त्या कार मधील १४ वर्षाच्या मुलीला बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत होते. कार मध्ये मागील सीटवर तीन पुरुष व ती मुलगी बसलेली होती. त्यांच्या या भांडणामुळे बरेच नागरिक जमा झाले, आम्ही तेथे गेलो असता तो प्रकार अनैतिक व्यापाराचा संशय आल्यामुळे आम्ही कदिम जालना पोलीस स्टेशनला फोन करून माहिती दिली. आम्ही पोलिसांना माहिती दिल्याचे त्यांना कळताच त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला असता आम्ही त्यांना रोखून धरण्याचा ३0 मिनिटे प्रयत्न केला त्यांनी आम्ही आपसात प्रकरण मिटवतो म्हणून आम्हाला न जुमानता पोबारा केला.

यावरून जालन्याच्या पोलिसावर किती विश्वास ठेवावा असा प्रश्न निर्माण झाला. जर पोलीस लवकर आले असते तर खरच प्रकार समोर आला असता. सर्व घटना घडल्यानंतर पोलीस आले, त्यांना उशीर का झाला असे विचारल्यानंतर खरा प्रकार समोर आला तो की, मुक्तेश्वर द्वार येथे असलेले पोलीस स्टेशन देहेडकरावाडी असून तीन ते चार किलोमीटर दूर असून मुक्तेश्वर द्वार पासून तर गांधी चमन पर्यंत वाहतूक व्यवस्था संपूर्णपणे कोलमडलेली. या रस्त्यावर वाहतुकीचा अडथळा. यामुळे घटनास्थळी पोहचण्यास उशीर झाला.

या सर्व बाबींचा विचार केल्यास आम्ही आपल्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की बाजार चौकी, सरस्वती भुवन येथील पोलिस चौकी व मस्तगड येथील पोलिस चौकी या पूर्णवेळ चालू ठेवणे गरजेचे आहे. येथे कायमस्वरुपी पोलीस कर्मचारी असणे गरजेचे आहे. तसेच कदिम जालना पोलीस स्टेशन हे परत पहिल्या ठिकाणी आणणे.

यात लक्ष घालून बाजार चौकी, सरस्वती भुवन पोलीस चौकी व मस्तगड पोलीस चौकीवर कायम स्वरुपी कर्मचारी नियुक्ती करावी व गांधी चौक चमन येथे नवीन पोलीस स्थापन करावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर रमेश देहेडकर, रसना देहेडकर, आयशा खान मुलानी,विद्याताई कुळकर्णी, सुनंदा बदनापुरकर, दिनकर घेवंदे, ॲड. ए. व्हि. सेवलीकर, दत्ता बरडे,रमेश शिंदे,शेख नईम शेख महंमद, जाकेर खान, जावेद शेख, सय्यद मोबीन, हकीम शेख, सय्यद जावेद, खय्युम शेख, कलीम शेख, शेख अख्तर, शेख रफिक, मुस्ताक शेख, शेख नदीम, सय्यद सुलतान आदींच्या सह्या आहेत.



**प्रभागात २५ मध्ये मुक्तेश्वर द्वार ते अन्नाभाऊ साठे चौक येथे ट्रिमिक्स रोड चे काम सुरु आहे या वेळी मा आयुक्त संतोष जी खांडेकर , महानगर अभियंता सऊद, कांट्रैक्टर आर के बाबरेकर व मी स्वतः कामा ची पहानी केली व कामा चा दर्जा बाबत चर्चा केली अस्ता सऊद साहेबा नि संगीतले की प्रथम मुरुम , नन्तर जीएसबी, डी एल सी, व ८ इंच लेपलीरींश असे दर्जेदार काम सुरु असल्याची प्रतिक्रिया दिली व समाधान व्यक्त केले व हे काम अंतिम टप्प्यात सुरू आहे.**

**(छायाचित्र किरण खानापुरे)**



जालन्याच्या आदित्य घुलेची आशियाई बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत चमकदार कामगिरी

## आदित्यने पटकावले ब्राँझ मेडल

**जालना । प्रतिनिधी -** जालन्याच्या आदित्य घुलेने आशियाई बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत चमकदार कामगिरी केलीय. आशियाई बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत आदित्यने पटकावले ब्राँझ मेडल मिळवत नावलौकिक मिळवला आहे. या यशाबद्दल विजेत्या आदित्यचा भाजपा नेते माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आलाय. शारीरिकदृष्ट्या अक्षम खेळाडु साठी झालेल्या स्पर्धेत मुळ चिंचांबाभर येथील आदित्य घुले याने ब्राँझ पदक पटकावुन देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशाबद्दल रिसोड तालुक्यातील अनेक खेळाडुंनी आदीत्य घुले यांचे अभिनंदन केले आसुन ही बाब तालुक्याच्या शिरपेचा मनातुरा रोवणारी आहे. दरम्यान आदित्य घुले यांनी संपादित केलेल्या याच्याबद्दल त्याच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## आनंद नगरीतून घेतले विद्यार्थ्यांनी व्यवहार ज्ञानाचे धडे : तपोवन गोंधन शाळेतील उपक्रम



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जाफराबाद तालुक्यातील तपोवन गोंधन येथील जिल्हा परिषद शाळेत शनिवारी विद्यार्थ्यांच्या आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भरलेल्या या आनंदनगरीत भाजीपाल्यासह विद्यार्थ्यांनी विविध चाट स्टॉल लावले होते. यावेळी खरेदीसाठी ग्रामस्थांनी येथे एकच गर्दी केली होती. या आनंदनगरीत जवळपास दहा हजार रुपयांची उलाढाल झाली. प्रारंभी या आनंद नगरीचे उद्घाटन नारळ फोडून गावचे सरपंच समाधान फलके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष परसराम फलके, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शिवाजी फलके, मुख्याध्यापक पृथ्वीराज तळेकर, माजी सरपंच गणेश फलके, पोलीस पाटील मधुकर चौधरी, मानव सेवा मंडळाचे भागाजी वाघमारे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती. आनंद नगरीच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक सुखदेव चेके, कैलास चेके, शिक्षिका सुलभा गायकवाड, नसीम शेख, शालेय मुख्यमंत्री उद्धव डोमाळे उपमुख्यमंत्री आर्यन हिवाळे आदींनी पुढाकार घेतला.

पाणीपुरी व वडापाव स्टॉलवर गर्दी या आनंदनगरीत शाळेतील विद्यार्थीनी गौरी सुरडकर हिने पाणीपुरी तर रुद्राक्षी हिने वडापाव चे स्टॉल थाटले होते. या दोन्ही स्टॉलवर विद्यार्थ्यांसह गावातील ग्रामस्थांनी खरेदीसाठी एकच गर्दी केली होती. तर विद्यार्थी आर्यन हिवाळे याने लावलेल्या चहाच्या स्टॉलवरही अनेकांनी थंडीत गरमागरम चहाचा आस्वाद घेतला.

व्यवहार ज्ञानाचा अनुभव मिळाला शाळेतील चार भिंतीत विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान कितीही शिकविले तरी त्यासाठी प्रत्यक्ष अनुभव देणे गरजेचे असते. या आनंदनगरीतून अनेक विद्यार्थ्यांनी तराजूने मोजमाप केले. शिवाय खरेदी विक्रीच्या माध्यमातून पैशांचा हिशोबही केला. यातून विद्यार्थ्यांना नफा, तोट्याचेही ज्ञान मिळाले. यातून मिळालेले ज्ञान हे विद्यार्थ्यांच्या चिरकाल स्मरणात राहील अशी प्रतिक्रिया तपोवन गोंधनच्या शिक्षीका सुलभा गायकवाड यांनी दिली.

टेंभुर्णीच्या यात्रेत नवभारत कनिष्ठ महाविद्यालय जेबीके विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिली भेट

## रहाट पाळणे, टोराटोरा, मच्छी पाळणा, लुटला आनंद

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील ग्रामदैवत दत्त महाराजांची यात्रा सुरू आहे. विविध आनंदाचे, तसेच शारीरिक कवायतीचे सर्कस, पाळणे सुद्धा आलेले असून या सर्कशीचा आनंद टेंभुर्णीतील सर्वात मोठी असलेल्या नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व जे बीके विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आनंदी शनिवार म्हणून, आनंद लुटला, सर्व विद्यार्थ्यांनी न्यू सर्कस यांचा आनंद लुटताना सर्कशीतील कवायतीचे दर्शन घेतले, सर्कशीतील कवायतगारांनी विद्यार्थ्यांचे मनोरंजन करतानाच विविध प्रकारे कसरतीचे प्रकार जादूचे प्रकार दाखवण्यात आले. टोरा टोरावर आनंद लुटताना विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. तसेच आकाश पाळणा, मच्छी पालन यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी आनंद लुटताना



आनंदाचा कहर केला. यासोबत विद्यार्थ्यांसोबत, संस्थेचे संचालक उपप्राचार्य दत्तसंस्थांचे विश्वस्त प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, प्राचार्य नंदकुमार काळे, कॉलेजचे प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक रामदास भांगे, प्राध्यापक केजी जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, शिक्षक सखाराम बोरकर, धनंजय पुरानी, रमेश इंगळे, वासुदेव क्षीरसागर, समाधान कांबळे, भीवसान ससाने, संजय कुलकर्णी, गणेश संवसाक्रे, दत्ता उखर्डे, राजेंद्र जगताप, आवटी मॅडम, पाटील मॅडम, कळंबे मॅडम, भिलावकर मॅडम, शेख मॅडम, तसेच सर्व शिक्षकांनी सुद्धा या आनंदी जत्रेचा आनंद लुटला, सर्वप्रथम सर्व विद्यार्थ्यांनी दत्त महाराजांचे दर्शन घेतल्यानंतर या यात्रेमध्ये आनंदासाठी असलेल्या सर्व आनंदी खेळांचा आनंद लुटला, तसेच या सर्व आनंदी वस्तूंचे, कॉन्ट्रॅक्टर शकील भाई, यांनी सर्व विद्यार्थ्यांसाठी सवलतीच्या दरामध्ये ही सर्व आनंदी खेळ उपलब्ध करून दिले. त्याला विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांचा आनंद पाहून सर्व शिक्षकांना आनंद झाला.

## बालविकास प्राथमिक शाळेत सेवानिवृत्त मुख्याध्यापिका भालेराव यांना श्रद्धांजली

**जालना । प्रतिनिधी -** कसबा येथील महिला मंडळ संचालित श्रीमती प्रभावतीबाई कोळेश्वर बालविकास प्राथमिक शाळेत माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग व शाळेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका स्व. सौ. शैलजा भालेराव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महिला मंडळाच्या सचिव सौ. विद्याताई कुलकर्णी, सदस्य श्रीमती विजया देशपांडे, सौ. सरोज दाभाडकर, सौ. दुर्गाताई अग्निहोत्री होती, सौ. मनीषाताई कुलकर्णी, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुजाता परदेशी, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी आपल्या मनोगतातून माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग व शाळेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका स्व. सौ. शैलजा भालेराव यांच्या कार्याला उजाळा दिला.



## हिंगोली येथे सम्राट प्रसेनजित विचार संमेलन

डॉ. कुमठेकर यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**जालना । प्रतिनिधी -** हिंगोली येथे दि.२९ डिसेंबर रोजी सम्राट प्रसेनजित विचार साहित्य मंच व सामाजिक न्याय भवन यांच्या संयुक्त विद्यमाने सम्राट प्रसेनजित विचार संमेलनांचे आयोजन करण्यात आले आहे. जालना येथील आंबेडकरी चळवळीतील लेखक व विचारवंत प्रा. डॉ. विजय कुमठेकर यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. हिंगोली येथील सामाजिक न्याय भवनाच्या सभागृहात आयोजित हे विचार संमेलन सम्राट प्रसेनजित तसेच सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाचे गाढे अभ्यासक ड. शिवराज कोळीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.या विचार संमेलनानिमित्त वेळी प्रा. डॉ. कुमठेकर यांचे 'मातंग महाराजा प्रसेनजित 'या पुस्तकाचे प्रकाशनही होणार आहे.बुध्द पुर्व काळात मातंग समाजाच्या अवस्थे बाबत व तत्कालीन समाज व्यवस्थेच्या संदर्भात यात विवेचन करण्यात आले आहे.'मातंग महाराजा प्रसेनजित ' या पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वी या पुस्तकावर आधारित साहित्य संमेलन होणार आहे,ही बाब जालना वासियांसाठी अतिशय गौरवाची व अभिमानाची आहे.या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने परिसंवाद व कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान हे विचार संमेलन होणार आहे.





**जालना विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार अर्जुन खोतकर व युवानेते संजय खोतकर यांचा संदिप गिंदोडीया, आदित्य बगडीया, प्रितेश मालपाणी, रोहित गौड, संदेश लव्हाडे, रघु भक्कड आणि दिपक पाहडे यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला**

# व्यापाऱ्याची साडेबारा लाखांची बॅग हिसकावून चोरट्यांनी केला पोबारा

**जालना । प्रतिनिधी -** शहरात गुन्हेगारांनी पुन्हा डोके वर काढले असून व्यापाऱ्यांची रोख रक्कम हिसकवण्याचे प्रकार अधून-मधून होत आहेत.वाढत्या गुन्हेगारीमुळे जूना मोंढा व नविन मोंढा भागातील व्यापारी वर्गामध्ये असुरक्षतेची भावना असून व्यापारी वर्ग प्रंचड दहशतीखाली वावरत असल्याचे चित्र वर्षभर पहावयास मिळाले. व्यापाऱ्यांच्या विविध संघटनांनी वेळोवेळी पोलीस प्रशासनाकडे आपल्या सुरक्षतते विषयी निवेदने,आंदोलने करून भावना व्यक्त केल्या परंतू जालन्यात व्यापाऱ्यांच्या लुटमारीवर कसलाही तोडगा न निघाल्याने अधून मधून व्यापाऱ्यांची रोख रक्कम हिसकावण्याचे प्रकार कमी होत नसल्याचे दिसून येत आहे.

असाच प्रकार दि. २७ डिसेंबर शुक्रवार रोजी जालन्यातील जूना मोंढा भागात घडला.जालना शहरातील जूना मोंढा भागात असलेल्या गुरुमुख होजिअरी कापड दुकानाच्या समोरील गल्लीमध्ये रात्री सव्वा नऊ वा. च्या सुमारास ऊभे असताना चार अज्ञात आरोपींनी व्यापारी वा त्यांच्या सोबत असलेल्या सरफराज फिरोज खान यांना मारहाण करून स्कुटीला लावलेली साडेबारा लाख रू. रोख रक्कम आसलेली बँग हिसकावून पळ काढला.




या घटनेने संपुर्ण व्यापारी वर्गामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आसून लवकरात लवकर आरोपींना अटक करण्याची मागणी होत आहे.

सदर प्रकरणी घनशाम भगतराम अग्रवाल रा.संभाजीनगर, माणिकनगर, जालना यांच्या फिर्यादिवरून आज दि.२८ शनिवार रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात कलम ३०९(४), ११५(२),३(५), भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर बाजार पोलीस अधिक तपास करत आहे.

## पोस्टाने मागविलेल्या दोन तलवारीसह पोलीसांनी एकास घेतले ताब्यात



**जालना । प्रतिनिधी -** मागील काही महिन्यांपासून जालना शहरांमध्ये पोस्टाने तलवारी आणि खंजीर मागवण्याचे प्रकार खूप मोठ्या प्रमाणात वाढले असल्याचे दिसून येत आहे. त्या अनुषंगाने पोलीस प्रशासन सुद्धा या प्रकरणाकडे आपली करडी नजर ठेवून आहे. या पार्श्वभूमीवर आज दिनांक २८ शनिवार रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास जालना शहरातील ढवळेश्वर येथे पोस्टाने मागविलेल्या दोन तलवारी घेऊन जात असताना एका संशयीत युवकास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून रंगेहात पकडले. कृष्णा शांतीलाल राजपूत वय २६ वर्षे रा. निधोना ता. जालना असे या संशयित आरोपीचे नाव असून त्याच्या ताब्यातून पोलिसांनी दोन तलवारी हस्तगत केल्या आहेत. आरोपी विरोधात चंदनझीरा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंद करण्यात येत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी दिले आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पोउपनि वाघ, पोलीस अंमलदार भाऊराव गायके, रुस्तुम जैवाळ, प्रभाकर वाघ, विजय डिक्कर, रमेश राठोड, अक्रूर धांडगे, रमेश काळे, सचिन राऊत, भागवत खरात यांनी केली आहे






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.